# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.04.2024** **वारःमंगळवार**

---

1) बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

2) रिझर्व बँकेच्या ९०व्या स्थापना दिनानिमित्त ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण

3) लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग

4) 2023-24 या आर्थिक वर्षात पुणे महापालिकेच्या तिजोरीत 2 हजार 273 कोटी रूपयांचा मिळकत कर जमा

आणि

5) महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात यंदा उन्हाळ्याची तीव्रता जास्त राहण्याचा हवामान विभागाचा इशारा

**<u>पंतप्रधान</u>**

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं यासाठी बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्याकरता धोरण निश्चितीची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या ९०व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोख विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

सर्वसमावेशक प्रगतीसाठी रिझर्व बँकेनं विविध क्षेत्रांची भविष्यातील गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची गरज असल्याचं पंतप्रधान म्हणाले. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी भाषणात घेतला. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं.

कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं राबवलेल्या उपाययोजनाचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावेळी कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले.

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आता वेग येत आहे.

परभणी लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते आणि महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते. गेल्या दहा वर्षांत देशाचा विकास करणाऱ्या नरेंद्र मोदी यांनाच तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी एकजुटीनं महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्यायचं आहे, असं अजित पवार यावेळी म्हणाले. मागच्या निवडणुकीत 41 खासदार महाराष्ट्रानं मोदींच्या झोळीत टाकले, यावेळी अधिक खासदार पाठवणार आहोत, त्यात पंकजा मुंडे आणि महादेव जानकर असतील, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

परभणी लोकसभा मतदार संघात गोविंद देशमुख आणि आप्पासाहेब ओंकार कदम यांनीही काल अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केले.

बुलडाणा जिल्ह्यात महायुतीकडून शिवसेनेचे उमेदवार विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांना उमेदवारी मिळाली आहे; तथापि, माजी आमदार विजयराज शिंदे यांनी काल भाजपाच्या वतीने तसंच अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे.

नांदेडमध्ये काल काँग्रेस पक्षातर्फे वसंत चव्हाण तर अपक्ष म्हणून महारुद्र पोपळाईतकर यांनी लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले.

**<u>निवडणूक रणधुमाळी</u>**

कॉंग्रेसनं काल जाहीर केलेल्या यादीत अकोला लोकसभा मतदारसंघातून डॉक्टर अभय पाटील यांना उमेदवारी घोषित केली आहे.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचाराचा पाथर्डी इथं काल प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते. यावेळी लंके यांच्या प्रचार फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं.

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रचार कार्यालयाचं उद्घाटन कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते झालं. याप्रसंगी पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार यांनी भाजप नेत्यांवर टीकेची तोफ डागली.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या ठाणे जिल्हा शाखेच्या वतीनं, इंडिया आघाडीचा बूथ प्रमुख कार्यकर्ता मेळावा रविवारी घेण्यात आला. कोपरखैरणे इथल्या शेतकरी समाज मंदिर इथं झालेल्या या मेळाव्याला आघाडीच्या घटक पक्षांचे बूथ प्रमुख, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**<u>अ. भा.रिपब्लिकन पक्ष</u>**

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रविण ऊर्फ बाळासाहेब खोब्रागडे यांनी काल महाविकास आघाडीला आपला पाठिंबा जाहीर केला. नागपूर इथं पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. अखिल भारतीय रिपब्लकिन पक्षाच्या पाठिंब्याने महाविकास आघाडीला आणखी बळ मिळाले आहे. अशा शब्दात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या पाठिंब्याचं स्वागत केलं.

**<u>मतदार जनजागृती</u>**

लोकसभा निवडणुकीसाठी एकीकडे राजकीय पक्षांचे नेते प्रचार दौरे, चर्चा, बैठका आणि भेटीगाठी करत आहेत; तर दुसरीकडे ही निवडणूक निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी, आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी विविध जिल्ह्यांचं प्रशासन सज्ज झालं आहे.

धुळे शहरातील होमगार्ड पथक कार्यालय इथं काल मतदार जनजागृतीचा कार्यक्रम झाला. यामध्ये मतदाना संदर्भातील तांत्रिक माहिती देण्याबरोबरच अहिराणी गीतांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आलं.

हिंगोली जिल्ह्यात सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या हस्ते मतदान जनजागृती रथाचा हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला.

**पुणे-भरारीपथक**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकानं काल पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातल्या सिंहगड, कासुर्डे, शिरगाव आणि अंबी या ठिकाणी छापे टाकत १ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यापुढेही अवैध दारु व्यवसायाविरुद्ध अशाच प्रकारच्या मोहिमा आखून सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचं राज्य उत्पादन शुल्क विभागानं म्हटलं आहे.

**वीजदरवाढ**

राज्यात कालपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढ होणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली असल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागत होते; आता १२८ रुपये लागतील. थ्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. तर वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

**शेअरबाजार-**

नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात देशातल्या शेअर बाजारात काल तेजीत झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३६३ अंकांची वाढ नोंदवत ७४ हजार १५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२ हजार ४६२ अंकांवर बंद झाला.

**पुणे पिंपरी-चिंचवडकर**

2023-24 या आर्थिक वर्षात 11 लाख 91 हजार 473 मिळकतधारकांनी मिळकत कराच्या स्वरूपात पुणे महापालिकेच्या तिजोरीत 2 हजार 273 कोटी रूपये जमा केले आहेत. ही रक्कम गेल्या वर्षीच्या तुलनेत 308 कोटी रुपयांनी अधिक आहे. महापालिकेच्या मिळकतकर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी काल पत्रकारांना ही माहिती दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागानं 2023-24 या आर्थिक वर्षात 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. महापालिकेच्या 41 वर्षांच्या इतिहासात प्रथमच जवळपास 1 हजार कोटींपर्यंत कर संकलन झालं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कर संकलनात 161 कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

**विद्यापीठ** सामंजस्य करार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ यांच्यात काल सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत दोन्ही विद्यापीठांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांचं आदान प्रदान करण्यात येईल, तसंच विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाभिमुख पदवी, पदविका अभ्यासक्रम राबवून संशोधन वाढीसाठी एकत्र काम केलं जाईल असं कुलगुरु प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांनी सांगितलं.

**आंबा महोत्सव**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती आणि राज्य कृषी पणन विभागाच्या सहकार्यानं समिती आवारात कालपासून आंबा महोत्सव सुरू झाला आहे. उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेवर आधारित, हा महोत्सव ३१ मे पर्यंत चालणार आहे. यामध्ये राज्यभरातील बचत गटांचे दहा स्टॉल आहेत तर रत्नागिरी, रायगड यासह विविध भागातून येणाऱ्या उत्पादकांचे सव्वाशे स्टॉल आहेत.

**पाणी टंचाई**

सोलापूर जिल्ह्यात उन्हाच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. काल तापमानाचा पारा ४१ पूर्णांक ६ अंशापर्यंत गेला होता. त्याचवेळी उजनी धरणासह लघु आणि मध्यम प्रकल्पातील पाणी पातळी कमालीची घटली आहे. त्यामुळे सोलापूर शहराचा पाणी पुरवठा आता पाच दिवसाऐवजी सात दिवसावर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातही पाणी टंचाईच्या झळा वाढत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक तालुक्यात टँकरची मागणीही वाढली आहे. सहा तालुक्यातील ३४ गावात सध्या ३८ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. आणखी काही दिवसात टँकरची संख्या वाढण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरावं आणि पाण्याचा अपव्यय टाळावा असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**उन्हाळा**

यंदाच्या उन्हाळ्यात देशाच्या विविध भागात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. एप्रिल ते जूनच्या कालावधीत महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान आणि कर्नाटकच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. मध्य महाराष्ट्रात उष्णतेची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**